# जिल्ह्यासाठी ‘राजर्षी शाहू कलावंत योजने’त लाभार्थी संख्या वाढवावी

## पालकमंत्री विखे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील लोककलाकारांच्या कलाविष्काराला योग्य मान्यता मिळावी यासाठी राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची भेट घेऊन ना. विखे यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या कलाविश्वात कार्यरत असलेल्या कलाकारांची संख्या लक्षणीय असून, सध्याच्या मर्यादित लाभार्थी संख्येमुळे अनेक गरजू कलावंत या योजनेपासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सध्या फक्त १०० वृद्ध कलाकारांना या योजनेचा लाभ दिला जातो. मात्र, नगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील विविध गावांमध्ये पारंपरिक लोककला जोपासणारे वासुदेव, पिंगळा, जोशी, गोंधळी, भराडी, आराधी, गारुडी, कोल्हाटी, डोंबारी, डक्कलवार, भोपे, भुत्या, तमाशा, संगीत बारी, नाट्य कलाकार, आदिवासी लोकनृत्य कलावंत मोठ्या संख्येने वास्तव्य करत आहेत. भौगोलिक दृष्ट्या सर्वांत मोठ्या जिल्ह्यांपैकी एक असलेल्या नगरमधील या सर्व पारंपरिक व लोककला जोपासणाऱ्या कलाकारांना योजनेंतर्गत न्याय मिळावा म्हणून लाभार्थींचा इष्टांक १०० वरून २०० पर्यंत वाढवण्याची विनंती ना. विखे यांनी केली आहे.

# आता प्रवाशांना मिळणार जलद सेवा

## एसटी महामंडळ आणणार ओला-उबरसारखं सरकारी ॲप

**मुंबई–** महाराष्ट्र सरकारने खासगी ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या ॲप्सप्रमाणे आता स्वतःचं एक ॲप तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. हे ॲप थेट एसटी महामंडळाद्वारे चालवण्यात येणार आहे. यामध्ये प्रवाशांना घरबसल्या बसचं बुकिंग करता येणार आहे, तसेच बस कुठे आहे हे ट्रॅक करता येणार आहे. वेळापत्रक पाहणं, ग्राहक सेवा मिळवणं अशा सुविधा एका क्लिकवर मिळणार आहेत. यामुळे एसटीचा प्रवास अधिक सोयीस्कर होईल आणि महामंडळाचं उत्पन्नही वाढेल, अशी सरकारची अपेक्षा आहे. हा निर्णय अलीकडील परिवहन खात्याच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकार आता ओला, उबर आणि रॅपिडो सारख्या खाजगी वाहतूक सेवांप्रमाणेच स्वतःचे ॲप विकसित करणार आहे. विशेष म्हणजे, हे ॲप राज्य रस्ते वाहतूक महामंडळ म्हणजेच एसटी द्वारे चालवले जाणार आहेत, अशा महत्त्वपूर्ण निर्णय परिवहन विभागाकडून घेण्यात आला. या नव्या ॲपमुळे एसटी स्थलांतर अधिक स्मार्ट आणि सोयीस्कर होईल असा दावा केला जात आहे.

हे ॲप पूर्णपणे एसटी महामंडळाद्वारे चालवले जाईल, प्रवाशांना एका क्लिकवर होम बस बुकिंग, बस लोकेशन ट्रॅकिंग, वेळापत्रक माहिती आणि ग्राहक समर्थन यासारख्या सुविधा मिळू शकतील. याद्वारे एसटीसी सेवा अधिक स्थलांतर-केंद्रित होईल आणि सरकारचे ध्येय मेगा कॉर्पोरेशनची निर्मिती वाढवणे आहे.

ॲप व्यतिरिक्त, आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी महामंडळाने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील एसटी महामंडळाच्या ८१ डेपो जमिनींच्या विकासासाठी दिलेला कालावधी ६० वर्षांचा होता.मात्र आता तो वाढवून ९७ वर्षांचा करण्यात आला आहे. कालबद्ध भाडेपट्टी तत्त्वावर या जमिनी खासगी भागीदारांकडे दिल्या जाणार आहेत. या जमिनी ‘अ’, ‘ब’ आणि ‘क’ अशा तीन श्रेणींमध्ये विभागल्या जातील आणि त्यांचे संच तयार करून विकासासाठी खुलं करण्यात येणार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून एसटी महामंडळ तोट्यात गेल्याची चर्चा सुरू आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दोन महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या एसटी महामंडळाच्या आर्थिक अहवालानुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी) संचित तोटा १०,००० कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. गेल्या पाच वर्षांत १२४ टक्क्यांनी वाढ झाली आह. या श्वेतपत्रिकेत तोटा नमूद करण्यात आला आहे. या अहवालांनुसार गेल्या ४५ आर्थिक वर्षांपैकी महामंडळाचे फक्त ८ वर्षांचे कालावधी नफा मिळवून देणारे राहिले आहेत. खत महामंडळाला वर्षभर सतत तोटा सहन करावा लागत आहे. हीच गोष्ट महामंडळाच्या आर्थिक अडचणी आणि कामकाजाच्या समस्यांकडे निर्देश करते.

# महिलेशी असभ्य वर्तन; गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)–** महिलेशी असभ्य वर्तन केले तसेच तिच्या पुतण्याला शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. २ ऑगस्ट रोजी घडली आहे.

२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास सदर महिला घराकडून किराणा दुकानात जात असताना पप्पू पाडळे हा तिच्याकडे पाहत होता. त्यावेळी तिने त्याला याचा जाब विचारला असता त्याने सदर महिलेशी असभ्य वर्तन करून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तेव्हा त्या महिलेने घडलेला प्रकार तिच्या दोन पुतण्यांना सांगितला. तेव्हा पुतण्यांनी, तू आमच्या चुलतीला का त्रास देतो? तिला त्रास देऊ नको. असे समजावून सांगत असताना आरोपीला राग आल्याने त्याने पुतण्याला शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, तुम्ही माझ्या नादी लागले तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. महिलेच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात पप्पू पाडळे याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११५ (२), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार एकनाथ आव्हाड हे करीत आहेत.

# ताराचंद म्हस्के पाटील पुन्हा अजित पवार गटात



**मुंबई–** माजी प्रवक्ते तथा पत्रकार ताराचंद म्हस्के पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मंगळवारी सोडचिठ्ठी देऊन पुन्हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात परतले आहेत.

मंगळवारी मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हस्के पाटील यांना पुष्पगुच्छ देऊन पक्षात दाखल करून घेतले. अजितदादा यांच्या आग्रहास्तव म्हस्के पाटील यांनी राजकारणात प्रवेश केला होता. प्रदेश प्रवक्ते म्हणून त्यांचेवर पक्षाने जबाबदारी सोपवली होती. लोकसभा निवडणुकीनंतर म्हस्के पाटील यांनी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला. म्हस्के पाटील आठ महिन्यात पुन्हा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी स्वगृही परतले.



**उत्तराखंडच्या उत्तरकाशीत पुन्हा एकदा निसर्गाचं रौद्ररुप पहायला मिळालंय, उत्तरकाशीच्या धराली गावात ढगफुटी झालीय, ढगफुटीमुळे डोंगराचा कडा नदीच्या प्रवाहात वाहून खाली आला, आणि क्षणात सगळं गायब झालंय, अंगाचा थरकाप उडवणारी ही घटना कॅमेऱ्यात कैद झालीय, ५० ते ६० जण या ढिगाऱ्यात बेपत्ता असून ४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आलीय.**

# करजगाव येथे एकास तलवारीने मारहाण

**गणेशवाडी (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील करजगाव येथे एकास तलवारीने मारहाण झाल्याची घटना घडली आहे.

एक वर्षापूर्वी ट्रॅक्टर पेटविल्याच्या वादातून यातील फिर्यादी विलास बबन आयनर, वय ३३, रा. अमळनेर हे त्यांचे कारने (एमएच १७ सीएक्स ८४९७) घरी जात असताना आरोपींनी रस्त्याच्या मधोमध पिकअप उभी केली असल्याने फिर्यादी यांनी आपली गाडी थांबवली. आरोपींनी त्यांचे गाडीला जोरदार धडक दिली व इतर आरोपींनी खाली उतरून गाडीच्या समोरील काचा फोडून नुकसान केले. त्यावेळी मी त्या ठिकाणाहून पळून जात असताना आरोपी क्रमांक दोन याने हातातील तलवार जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारली, परंतु हात मध्ये घातल्याने हाताला दुखापत झाली. तसेच बाटलीत सोबत आणलेले ॲसिड डोक्यावर ओतल्याने गंभीर दुखापत झाली. आरोपी क्रमांक सहाने लोखंडी गजाने मारहाण केली तर काहींनी मिरची पावडर तोंडावर फेकून मारली असल्याचे दि. ४ रोजी सोनई पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. त्यानुसार आरोपी कर्णा धर्माजी पवार, पांडुरंग धर्माजी पवार, कुंदा कर्णासाहेब पवार, सरिता पांडुरंग पवार, शुभम कर्णासाहेब पवार, सर्व रा. अमळनेर, दादासाहेब गोरक्षनाथ पवार, रा. निंभारी यांच्याविरुद्ध गुन्हा र. नं. २८८/२०२५ बीएनएसचे कलम १०९(१), १२४(१), ११८(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३२४(४)(५), १२६(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी हे करत आहेत.

## पान १ वरुन

### यंदा २०१७ प्रमाणेच गट...

निश्चित करत निवडणूका घेण्याचे आदेश दिले आहेत. याबाबतचा अंतिम निर्णय राज्य सरकारवर सोपवण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने देखील २०१७ ला नूसार सर्वसाधारण, सर्वसाधारण महिला, ओबीसी, ओबीसी महिला, अनुसूचित जाती व जमाती महिला व पुरूष यानूसार आरक्षण काढण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. यात राखीव मतदारसंघातील आरक्षण बदलणार नसले तरी ओबीसी मतदारसंघासाठी लॉटरी काढण्यात येणार आहे. यात प्रत्येक तालुक्यात ओबीसी लोकसंख्येनूसार ओबीसी पुरुष व महिला, सर्वसाधारण पुरूष आणि सर्वसाधारण महिला असे आरक्षण काढण्यात येण्याची शक्यता आहे. मात्र, काढण्यात येणाऱ्या आरक्षणाबाबत राज्य निवडणूक आयोग व राज्य सरकार काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे असून त्यानूसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडती काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

२०१७ ला नगर जिल्ह्यात असणाऱ्या ७३ जिल्हा पषिद गटापैकी ३७ गट हे सर्वसाधारण (पुरुष व महिला), २० गट हे ओबीसी (पुरुष व महिला), अनुसूचित जाती (पुरूष व महिला) ७ आणि अनुसूचित जमाती (पुरूष व महिला) ९ असे राखीव होते. यात त्यावेळी असणाऱ्या राखीव गटांची संख्या तीच राहणार असून केवळ रोटेशननूसार आरक्षण बदलणार असल्याचे निवडणूक विभागाच्या सुत्रांकडून सांगण्यात आले.

### अमेरिका भारतीय वस्तूंवर...

रशियाकडून तेल खरेदी करत आहे, त्याची विक्री करुन चांगला फायदा देखील मिळवत आहे. रशियासोबतच्या व्यापारामुळं भारतावरील टॅरिफ वाढवणार असल्याचं ट्रम्प म्हणाले होते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली होती. भारतानं फक्त रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत नाहीतर खरेदी केलेल्या तेलापैकी काही मोठ्या प्रमाणात विक्री करुन नफा मिळवत आहे. भारताला रशियाच्या युद्धामुळं यूक्रेनमध्ये किती लोक मारले जात आहेत याची पर्वा नाही यामुळं भारतावरील टॅरिफ वाढवत आहोत, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ आणि रशियासोबतच्या व्यापाराबाबत जी भूमिका घेतली त्याला भारताच्या विदेश मंत्रालयानं उत्तर दिलं आहे. ट्रम्प यांची भूमिका अयोग्य आणि तर्कहीन असल्याचं भारतानं म्हटलं. विदेश मंत्रालयानं अमेरिकेच्या दुहेरी भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. अमेरिका आतापर्यंत रशियाकडून अण्वस्त्र उद्योगासाठी लागणारं यूरेनियम हेक्साफ्लोराइड, इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक असलेल्या पॅलेडियम, उर्वरक आणि केमिकलची आयात करतो, असं भारतानं उत्तर दिलं होतं.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून विविध देशांवर टॅरिफ लागू करणार असल्याचं जाहीर केलं होतं. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली होती. त्यासोबत भारतावर रशियासोबत व्यापार करत क्रूड ऑईल आणि शस्त्रखरेदी करत असल्यानं दंड लादणार असल्याचं जाहीर केलं होतं. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेला भारताकडून देखील जशास तसं उत्तर दिलं जात असल्याचं पाहायला मिळत आहे. येत्या काळात अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापार करार होत असताना त्यामध्ये कोणत्या गोष्टींवर समझोता होणार ते पाहावं लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत सर्वाधिक टॅरिफ आकारणाऱ्या देशांपैकी एक देश असल्याचं म्हटलं होतं.

### ट्रम्प टेरिफची धास्ती...

डॉलरवर बंद झाला. मागील सत्रात, सेन्सेक्स ४१८.८१ अंकांनी वाढून ८१,०१८.७२ वर तर निफ्टी १५७.४० अंकांनी वाढून २४,७२२.७५ वर बंद झाला होता. बेंचमार्क निर्देशांकावर उच्च पातळीवर विक्रीचा दबाव जाणवला. निफ्टी ७३ अंकांनी, तर सेन्सेक्स ३०८ अंकांनी खाली आला.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर मोठ्या प्रमाणात शुल्क वाढवण्याची योजना जाहीर केल्यानंतर वाढलेल्या भू-राजकीय तणावामुळे बेंचमार्क निर्देशांकांमध्ये मोठी घसरण झाली. तेल आणि वायू, आयटी आणि एफएमसीजी सारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये घसरण झाली, ज्यामध्ये आयसीआयसीआय बँक, टेक महिंद्रा, रिलायन्स इंडस्ट्रीज, इन्फोसिस, एशियन पेंट्स आणि अदानी पोर्ट्स सारख्या दिग्गज कंपन्यांचा समावेश होता. उलट, ऑटो स्टॉक्स आणि मेटल स्टॉक्समध्ये काही लवचिकता दिसून आली, ज्यामुळे व्यापक तोटा मर्यादित राहिला.

### अपार्टमेंटच्या आकाराच्या...

नाराजी व्यक्त केली होती.

तसेच कॉन्डोमिनियम व्यवस्थापन मंडळाचा हा निर्णय म्हणजे कायद्याचं उल्लंघन असल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर या फ्लॅट्स धारकांच्या म्हणण्यासंदर्भात सहमती दर्शवत प्रमाणानुसार देखभाल शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयाला काही फ्लॅट्सच्या मालकांनी पुण्यातील सहकारी न्यायालयात धाव घेतली होती. मे २०२२ मध्ये त्यांचा खटला न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्यानंतर या फ्लॅट्स धारकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर या फ्लॅट्स धारकांच्या वकिलांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की देखभालीचा खर्च हा सर्व रहिवाशांनी समान वापरलेल्या क्षेत्रांसाठी आणि सुविधांसाठी केला जातो. तसेच जास्त आकाराच्या फ्लॅट्समध्ये जास्त रहिवासी आहेत असं गृहीत धरणं आणि म्हणून त्यांना जास्त देखभाल शुल्क आकारणं हे अन्याकारक आहे. मात्र, यावर उच्च न्यायालयाने असहमती दर्शविली.

यासंदर्भात न्यायाधीशांनी म्हटलं की, कायदा आणि कॉन्डोमिनियमचे स्वतःचे घोषणापत्र दोन्ही अपार्टमेंटच्या आकारानुसार प्रमाणित देखभालीचे (मेंटेनन्स चार्जेस) समर्थन करतात. त्यामुळे न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आणि मोठी अपार्टमेंट असलेल्या फ्लॅट मालकांना देखभालीच्या खर्चाचा वाटा जास्त द्यावा लागेल, असा निर्णय दिला. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

### लाडकी बहिण आधी पात्र...

दिले जात होते पण निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यातच योजनेत काही नियम अटी लागू करण्यात आल्या. या नियम अटींच्या माध्यमातून योजनेतील लाखो महिलांना अपात्र ठरवण्यात आले. त्यानंतरही अनेक अटी लागू करून पुन्हा महिलांना अपात्र ठरवून त्यांचा योजनेचा लाभ रद्द करण्यात आला. योजनेतील अटी नियमांमुळे आता राज्यातील महिला वर्गातून तीव्र नाराजीचा सूर उमटू लागला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सर्व महिलांना सरसकट योजनेचा लाभ देण्यात आला. मग आता पुन्हा अर्जांची पडताळणी का केली जात आहे, महिलांना अपात्र का ठरवण्यात येत आहे, असे प्रश्न आता महिला वर्गातून उपस्थित होत आहेत.

राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात जनवादी महिला संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. संघटनेच्या वतीने काल थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही गंभीर आरोप करण्यात आले. निवडणुकीपूर्वी लाभ देताना अधिकाऱ्यांनी अर्ज तपासले नाहीत आणि मग आता का महिलांना दोषी ठरवले जातयं, जर त्यावेळी महिला पात्र होत्या, त्यावेळी आम्हाला लाभ दिला गेला, तर आता अचानक महिलांना अपात्र का ठरवले जात आहे, असा प्रश्न ही या महिलांकडून उपस्थित केला जात आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत महिलांचा नव्हे तर प्रशासनाचा दोष आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेवर अर्ज तपासले असते तर महिलांवर अशी परिस्थिती ओढावली नसती. योजनेच्या नावाखाली निवडणुकीत महिलांना आकर्षित करण्यासाठी राज्य शासनाने हा निर्णय घेतला, असा आरोपही संघटनेकडून करण्यात आला. पण आता जर अपात्र महिलांना पुन्हा पात्र करून लाभ दिला गेला नाही तर याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाईल, असा इशाराही जनवादी महिला संघटनेने दिला आहे. राज्य शासनाच्या योजनांमध्ये पारदर्शकता आणि प्रशासनाची जबाबदारी ही निकष ठरवणारी ठरावी, अशी मागणीही यावेळी संघटनेकडून करण्यात आली.

### पाच वर्षात सव्वालाख उद्योजक...

होईल. यात शहरी आणि ग्रामीण भागांतील तसेच महिलांच्या आणि युवकांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना विशेष प्रोत्साहन दिले जाईल. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप उद्योग आहेत. ३१ मे, २०२५पर्यंत राज्यातील स्टार्टअप उद्योगांची संख्या २९ हजार १४७ आहे. देशाच्या एकूण स्टार्टअपच्या संख्येत १८ टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. स्टार्टअप उद्योगांना अधिक प्रभावी परिसंस्था तयार करण्यासाठी कालसुसंगत नवीन धोरण आखण्यात आले आहे. या धोरणात नवोपक्रम, उद्योजक, गुंतवणुकदार यांच्यासाठी प्रभावी इकोसिस्टम विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. या धोरणातील एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे मुख्यमंत्र्यांचा महा-फंड, ज्यामध्ये ५०० कोटी रुपयांचा निधी असून, यामार्फत सुरुवातीच्या टप्प्यातील २५ हजार उद्योजकांना मार्गदर्शन, इन्क्युबेशन आणि आर्थिक मदत दिली जाणार आहे.

महाराष्ट्र स्टार्टअप वीकअंतर्गत निवडलेले स्टार्टअप्स थेट शासन विभागांसोबत काम करू शकतील. त्यांना २५ लाखांपर्यंतच्या पायलट वर्क ऑर्डर्स दिल्या जातील. तसेच, पेटंट नोंदणी, उत्पादन गुणवत्ता प्रमाणपत्रे, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभाग यासाठी आर्थिक भरपाई दिली जाईल. तसेच सार्वजनिक संस्था आणि इतर विश्वासार्ह ग्राहकांकडून वर्क ऑर्डर्स प्राप्त झालेल्या स्टार्टअप्सना कर्ज सहाय्यासाठी खास यंत्रणा निर्माण केली जाईल. राज्यातील प्रत्येक विभागाने आपल्या वार्षिक निधीपैकी ०.५% रक्कम नवप्रवर्तन आणि उद्योजकता प्रोत्साहनासाठी राखीव ठेवणे बंधनकारक असेल. सर्व योजना महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत राबविल्या जातील. या धोरणात नागरिक, स्टार्टअप्स, शैक्षणिक संस्था, इन्क्युबेटर्स, गुंतवणूकदार आणि विषयतज्ज्ञांचा सक्रिय सहभाग घेण्यात आला आहे. त्यांच्या अभिप्रायावर आधारित प्रादेशिक इन्क्युबेशन समर्थन, सुलभ प्रोत्साहन प्रक्रिया, डिजिटल साक्षरता तसेच उद्योजकीय कौशल्यविकास यासारख्या बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**वाढवण बंदर फ्रेट कॉरिडॉरने समृध्दीला जोडणार**

पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर (तवा) आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग यांना फ्रेट कॉरिडॉर या शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने भरवीर (ता. चांदवड, जि. नाशिक) येथे यांना जोडण्यात येणार आहे. या १०४. ८९८ किलोमीटरच्या शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून हाती घेण्यात येईल. प्रकल्पासाठी हूडकोकडून १ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात येणार आहे. या कर्जासह २ हजार ५२८ कोटी ९० लाख रुपयांच्या तरतूदीस देखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली. प्रकल्पाचे काम ३ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहे.

वाढवण बंदराच्या भविष्यातील मोठयाप्रमाणावरील वाहतूक वर्दळीचा विचार करता विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील वाहतूक वर्दळीस उपयुक्त अशा महामार्गाची निर्मिती अत्यंत आवश्यक आहे. हा शिघ्रसंचार द्रूतगती महामार्ग पालघर जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड, जव्हार आणि मोखाडा या तसेच नाशिक जिल्ह्यातील त्रंबकेश्वर आणि इगतपुरी तालुक्यातून जाणार आहे. या महामार्गामुळे तवा भरवीर हे वडोदरा - मुंबई एक्सप्रेस मार्गे अंतर समृद्धी महामार्ग १८३.४८ किमी ऐवजी १०४.८९८ किमी होणार आहे. त्यामुळे वाहतुकीच्या अंतरात ७८.५८२ किमी बचत होणार आहे.

**सरकार मालकीच्या चिंचोळ्या, अयोग्य आकाराच्या लँड लॉक्ड भूखंडाच्या वितरणाचे धोरण**

राज्य सरकारच्या मालकीच्या चिंचोळ्या, स्वतंत्ररीत्या बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लँड लॉक्ड स्वरूपातील शासकीय किंवा नझूल जमिनींच्या वाटपासाठी धोरणास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अशा प्रकारच्या जमिनी भूखंडधारकांना त्यांच्या विद्यमान धारणाधिकाराच्या स्वरूपानुसारच देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे घराच्या मागील बाजूस असलेल्या बोळकांड्या, सफाई गल्ल्या किंवा अन्य उपयुक्ततेअभावी वापरात न आणलेल्या जमिनी अधिकृतपणे लागूपड धारकांच्या मालकीत येणार आहेत. महसूल आणि वन विभागाच्या ९ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार हे धोरण स्पष्ट करण्यात आले असून, १९७१ मधील महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट) नियमांतर्गत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या नियम ३७अ नुसार ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. या निर्णयामुळे अतिक्रमण, तक्रारी आणि कायदेशीर वादांनाही आळा बसेल. शिवाय शहरी विकासाला अधिक शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध दिशा मिळणार आहे.

**एसटी महामंडळाचे डेपो ९८ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर**

एसटी महामंडळाला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एसटी डेपो भाडेपट्ट्यावर देण्याच्या सुधारित धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सुधारित धोरणानुसार महामंडळाच्या जमिनींच्या भाडेपट्टा कराराचा कालावधी आता ६० वर्षांऐवजी ४९ वर्षांच्या दोन टप्प्यात मिळून ९८ वर्षे करण्यात आला आहे.या कालावधी वाढीमुळे महामंडळाच्या प्रस्तावित प्रकल्पांच्या विकासाला गती लाभेल, असा विश्वास सरकारला आहे. या धोरणानुसार खासगी भागीदारांना बसस्थानकांच्या पुनर्विकासाचे हक्क दिले जातील. त्या बदल्यात त्यांच्याकडून प्रीमियम आकारण्याऐवजी विकसित करण्यात आलेल्या व्यापारी जागेतील हिस्सा घेतला जाईल. ही जागा भाड्याने देऊन महामंडळाला सातत्याने उत्पन्न मिळेल. आर्थिक गर्तेत असलेल्या महामंडळाचा तोटा तब्बल १० हजार ३०० कोटींवर गेल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

महामंडळाने ५९८ बसस्थानके आणि २५१ आगारांपैकी काही ठिकाणे पीपीपी मॉडेलवर भाडेपट्ट्याने देण्याची प्रक्रिया २० वर्षांपूर्वी सुरू केली होती. त्यावेळी ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टा दिला गेला, त्यात ४५ बसस्थानकांचा पुनर्विकास झाला. ऑक्टोबर २०२४ मध्ये हा कालावधी ६० वर्षांपर्यंत वाढवून आणखी ७२ बसस्थानकांचा पीपीपी मॉडेलवर विकास करण्याचा निर्णय घेतला. मात्र आता हा प्रस्ताव सरकारने थांबवून नव्याने ९८ वर्षांच्या भाडेपट्ट्यासाठी निविदा काढण्याची तयारी सुरू केली आहे. ६० वर्षांचा कालावधी निश्चित करून अवघ्या आठ महिन्यांत तो ९८ वर्षांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतल्यामुळे अनेकांचे भुवया उंचावल्या आहेत.

**अजित पवारांचा आक्षेप**

दरम्यान, एसटी महामंडलाच्या जागा थेट ९८ वर्ष भाडेपट्ट्याने देण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत अजित पवारांनी आक्षेप घेतल्याचे समजते. ६० वर्ष भाडेपट्ट्याने देण्याचे धोरण तयार केले असताना आता एवढा कालावधी वाढवण्याची गरज आहे का ? असा सवाल त्यांनी बैठकीत विचारल्याचे सूत्रांनी सांगितले.

### जिल्हा लम्पीबाधित क्षेत्र म्हणून...

आदेश काढले असल्याची माहिती पशूसंवर्धन विभागाच्यावतीने देण्यात आली. जिल्ह्यात सध्या संगमनेर तालुक्यातील साकूर, बिरेवडी, मांडवे, कनोली, रहिमपूर, निमगावजाळी, चिंचपूर, शिपलापूर, पिंपरी, शेवगावमधील वडुले, जामखेडमधील खर्डा या ठिकाणी जनावरांमधील लम्पीचा संसर्ग अधिक असल्याचे पशूसंवर्धन विभागाला दिसून आले आहे. या ठिकाणी लम्पीचा फैलाव वाढल्याने संबंधीत गाव व त्यांच्या पाच किलोमीटर त्रिज्येच्या परिसरास पशूसंवर्धन विभाग व जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून घोषित केला आहे. जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत लम्पी आजाराचा फैलाव वाढत आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांची धावपळ उडाली आहे. हे लक्षात घेऊनच जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण जिल्हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित केला आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ८८८ बाधित जनावरे आढळून आली असून त्यापैकी ५१४ जनावारे लम्पीमुक्त झाली आहेत. तर ३७४ जनवारांवर उचार सुरू आहेत. त्यापैकी ८ अत्यवस्थत आहेत. आतापर्यंत ३५ जनावरे मृत्युमुखी पडली.

**बाधित पशुधनाच्या संपर्कात असलेली कोणत्याही प्रकराची वैरण, गवत अन्य साहित्य. प्राण्याचे शव, कातडी कोणताही भाग, प्राण्यांचे उत्पादन याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात यावी अशा सुचना देण्यात आल्या आहेत. प्राण्याचा बाजार भरण्यावर प्रतिबंध करण्यात आला आहे. त्याबरोबर शर्यती, जत्रा, प्रदर्शन यावर प्रतिबंध करण्यात आला असून त्याचे पालन करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिल्या असून त्याचे पालन न करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. त्याबरोबर प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण पशुसंवर्धन विभागाने तातडीने करावे. ही जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. त्यांनी ती व्यवस्थित पार पाडण्याचे देण्यात आले आहेत.**

**स्थानिक प्रशासनासह गृह विभागावर जबाबदारी**

जिल्ह्यात आता जनावरांची होणारी वाहतूक थांबवण्यात आली असून या ठिकाणी ही वाहतूक होणार नाही, याची दक्षता परिवहन विभागाने घ्यावी, तसेच स्थानिक प्रशासनाने जनावरांचा एका भागातून दुसऱ्या भागात प्रवेश होणार नाही बाधित जनावरांच्या स्वतंत्रण पाणी व चाऱ्यांची व्यवस्था करावी, भटक्या पशूधनाचे नियमित निरिक्षण करावे, जनावरांच्या बाजार बंदीवर कृषी उत्पन्न समिती व गृह विभागाने नियंत्रण ठेवावे, बाधित जनावरांच्या संपर्कात आलेल्या चाऱ्याची विल्हेवाट लावावी, गायी व म्हशीचे विलगीकरण करावे, यासाठीचे नियोजन स्थानिक स्वराज्य संस्थांनी करण्याचे आदेशात स्पष्ट केले आहे.